## प्रेसनोट

दि. २३/०४/२०२४

भुमी अभिलेख कार्यालय, ता. खेड, जि. पुणे येथील टायपिस्ट म्हणून नेमलेल्या खाजगी महिलेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. गु.र.नं. २७७/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ. |
| तक्रारदार | महिला, वय - ५५ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | सुनंदा गणेश वाजे, खाजगी टायपिस्ट, भुमी अभिलेख कार्यालय,ता. खेड, जि. पुणे. रा. तारकाई डोन, वाडा रोड, ता. खेड, जि. पुणे. (खाजगी महिला) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ९,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ७,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ७,०००/- रुपये (सात हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | २२/०४/२०२४ |
| सापळा दिनांक | २२/०४/२०२४ |

ठिकाण :- भुमी अभिलेख कार्यालय, ता. खेड, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :-

यातील तक्रारदार यांचे पतीचे नावे मु.पो. साबर्डी, ता. खेड, जि. पुणे येथे गट नं. २४५ मध्ये एकुण ६३ गुंठे शेत जमीन असून, सदर गटाची मोजणी करण्याकरीता तक्रारदार यांचे पती यांनी दि. १/१/२०२४ राजी उपअधीक्षक भुमी अभिलेख, नगर भुमापक अधिकारी, ता. खेड, जि. पुणे यांच्याकडे अर्ज दिला होता. खाजगी टायपिस्ट महिला सुनंदा वाजे ह्या सध्या नगर भुमापन अधिकारी खेड कार्यालयामध्ये खाजगी टायपिस्ट म्हणून काम करतात. खाजगी टायपिस्ट महिला सुनंदा वाजे यांनी तक्रारदार यांचेकडे सदर काम करण्यासाठी प्रथम १२,०००/- रुपये व त्यानंतर ऑनलाईन फॉर्म भरण्याकरीता आणखी २,०००/- रुपये लागतील असे सांगितल्यावर, तक्रारदार यांनी सदर रक्कम रोख स्वरुपात दिली. तक्रारदार यांचे पतीचे नावे असलेल्या जमीनीची मोजणी करण्यात आली. त्यानंतर खाजगी महिला सुनंदा वाजे यांनी तक्रारदार यांना फोन करुन, लोकसेवकाने जमीन मोजणी करीता आणलेली मशिनचे आणखी ६,०००/- रुपये व जमीनीचे कागदपत्र तयार करणेकरीता ३,०००/- रुपये असे लोकसेवकाकरीता एकुण ९,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, खाजगी टायपिस्ट महिला सुनंदा वाजे यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष वरील कामकाजासाठी लोकसेवकाकरीता तडजोडीअंती ७,०००/- रुपयाची लाच रक्कमेची मागणी करुन, खाजगी टायपिस्ट महिला सुनंदा वाजे यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ७,०००/- (सात हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक अतुल भोसले तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.